महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे परिपत्रक :**

जा.क्र.तंशिविकापु/विवि-१/GRC/२०२३/ 1672
दिनांक : 20 APR 2023

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखाली असलेल्या
**पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व विनाअनुदानित संस्था**
**(पुणे विभाग पुणे).**

**विषय :- विनाअनुदानित संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या तक्रार निवारणाबाबत.**

संदर्भ :- १. AICTE Notification F No.1-103/AICTE/PGRC/Regulation/2021, दि. 22.03.2021
२. नियामक मंडळाच्या ५३ व्या बैठकीत झालेला निर्णय.
३. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र जा.क्र.मरातंशिमं/का-५४/२०२२/५८५६, दि.२६.०९.२०२२

उपरोक्त विषयाबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी **संदर्भ क्र. १** अन्वये, "All India Council for Technecal Education Redressal of Grievance of Faculty / Staff Member Regulations, 2021" जारी केलेले आहेत. सदर Regulations, मध्ये संस्थास्तरावरील तक्रार निवारण समितीची रचना, तक्रारीचे स्वरुप तसेच तक्रार निवारणाबाबतचे निर्देश नमूद केलेले आहेत. तसेच तक्रारदार तक्रार निवारण समितीच्या आदेशावर समाधानी नसेल तर तो अपिलीय समितीकडे अपिल करु शकतो, असेही नमूद केलेले आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सदर Regulations लागू करण्याबाबतची बाब **संदर्भ क्र. २** अन्वये, मंडळाच्या ५३ व्या नियामक मंडळाच्या बैठकीत ठेवली असता, त्यावर चर्चा होऊन नियामक मंडळाने तक्रार निवारण समिती व अपिलीय समिती स्थापन करण्यास मान्यता देऊन अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी वरील **संदर्भ क्र.३** अन्वये, संस्थास्तरावरील तक्रार निवारण समितीची व अपिलीय समितीची रचना विहीत केली असून, या समितीमध्ये या विभागीय कार्यालयातील **सहाय्यक संचालक** यांचा सदस्य म्हणून समावेश केलेला असल्यामुळे, त्यांचे नांव, पदनाम व इतर तपशील खालीलप्रमाणे आहे -

| अ. क्र. | या विभागीय कार्यालयातील प्रतिनिधीचे नांव | पदनाम | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| १. | श्री. मारुती राजाराम जाधव | सहाय्यक संचालक (तांत्रिक) | ropune@dtemaharashtra.gov.in |

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व),मुंबई – ४०० ०५१
दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१५१/१६०

web : www.msbte.org.in email : director@msbte.com


जा.क्र.मरातंशिमं/का-५४/ GRC/२०२२/ 5856 दिनांक 26 SEP 2022

महत्वाचे परिपत्रक

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नित सर्व विनाअनुदानीत संस्था.

**विषय- विनाअनुदानीत संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या तक्रार निवारणाबाबत.**

**संदर्भ-** १. AICTE Notification F No.1-103/AICTE/PGRC/Regulation/2021 दि. 22/03/2021.
२. नियामक मंडळाच्या ५३ व्या बैठकीत झालेला निर्णय.

उपरोक्त विषयाबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. १ अन्वये "All India Council for Technical Education (Redressal of Grievance of Faculty / Staff member) Regulations, २०२१" जारी केलेले आहेत. सदर Regulations मध्ये संस्थास्तरावरील तक्रार निवारण समितीची रचना, तक्रारीचे स्वरूप तसेच तक्रार निवारणाबाबतचे निर्देश नमूद केलेले आहेत. तसेच तक्रारदार तक्रार निवारण समितीच्या आदेशावर समाधानी नसेल तर तो अपिलीय समितीकडे अपिल करू शकतो, असेही नमूद केले आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या सदर Regulations लागू करणेबाबतची बाब संदर्भ क्र. २ अन्वये मंडळाच्या ५३ व्या नियामक मंडळाच्या बैठकीत ठेवली असता त्यावर चर्चा होऊन नियामक मंडळाने खालील प्रमाणे तक्रार निवारण समिती व अपिलीय समिती स्थापन करण्यास मान्यता देऊन अंमलबजावणी करणेबाबतचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार संस्थास्तरावरील तक्रार निवारण समितीची (Grievance Redressal Committee-GRC) रचना खालील प्रमाणे आहे.

| **संस्थास्तरावरील तक्रार निवारण समिती** | **पदनाम** |
|---|---|
| प्राचार्य, संबंधित संस्था. | अध्यक्ष |
| सहाय्यक संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संबंधित विभागीय कार्यालय. | सदस्य |
| सहाय्यक सचिव, मंडळाचे संबंधित विभागीय कार्यालय. | सदस्य |
| संबंधित संस्थेतील एक वरिष्ठ विभाग प्रमुख अथवा निवड श्रेणी अधिव्याख्याता. | सदस्य सचिव |

तक्रारदाराने त्याची तक्रार संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडे तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष म्हणून सादर करावी. संस्थास्तरावरील तक्रारीचे निवारण उपरोक्त् समितीमार्फत तक्रार प्राप्त् झाल्यापासून १५ दिवसाच्या आत करण्यात यावे. तसेच तक्रार निवारण समितीने पारित केलेला आदेश तक्रारदारास मान्य् नसल्यास व त्यास आव्हान करावयाचे असल्यास समितीच्या आदेशाची प्रत मिळाल्या पासून १५ दिवसात अपिलीय समितीकडे अपिल करता येईल.

विभागीय स्तरावरील अपिलीय तक्रार निवारण समितीची रचना खालील प्रमाणे आहे.

| अपिलीय समिती | पदनाम |
|---|---|
| उपसचिव, मंडळाचे संबंधित विभागीय कार्यालय. | अध्यक्ष |
| सहाय्यक संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे संबंधित विभागीय कार्यालय. | सदस्य |
| शासकीय तंत्रनिकेतनाचे प्राचार्य. | सदस्य |
| सहाय्यक सचिव, मंडळाचे संबंधित विभागीय कार्यालय. | सदस्य सचिव |

उपरोक्त प्रमाणे नमूद केल्यानुसार विनाअनुदानित संस्थेतील संस्थास्तरावरील तक्रार निवारण समितीच्या स्थापनेबाबतचे आदेश तात्काळ जारी करावेत व संस्थेच्या संकेत स्थळावर त्यास प्रसिद्धी दयावी. याबाबत संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना अवगत करावे.

तसेच अपिलीय समितीच्या स्थापनेबाबतचे आदेश मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयाने तात्काळ जारी करावेत. तक्रारदाराच्या अपिलावर अपिलिय समितीने अपिलाबाबतचा अर्ज प्राप्त् झाल्यानंतर जास्तीत जास्त् ३० दिवसाच्या आत त्याचे निवारण करून आदेश जारी करावेत आणि सर्व संबंधिताना आदेशाची प्रत दयावी.

अशाप्रकारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या तक्रारींवर प्रथमत: संस्थास्तरावर कार्यवाही करण्यात यावी. तदनंतर तक्रारदाराकडून अपिल प्राप्त् झाल्यास त्यावर अपिलीय समितीमार्फत कार्यवाही करण्यात यावी.

मंडळाकडे किंवा वरिष्ठ कार्यालयाकडे थेट तक्रार प्राप्त् झाल्यास त्याबाबत मंडळाकडून किंवा वरिष्ठ कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत माहितीकरिता :-
मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.

प्रत माहिती व कार्यवाहीकरिता :-
१. सहसंचालक तंत्रशिक्षण संचालनालय विभागीय कार्यालय मुंबई/ पुणे / नाशिक /अमरावती /नागपूर /औरंगाबाद.
२. उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय मुंबई/ पुणे/ नागपूर/ औरंगाबाद.

# APPENDIX-15

## Grievance Redressal Mechanism for Students and Faculty

### 1) Grievance Redressal Mechanism for Students

In order to provide opportunities for redressal of certain grievances of students already enrolled in any institution, as well as for those seeking admission to such institutions, AICTE has notified All India Council for Technical Education (Redressal of Grievance of Students) Regulation, 2019 vide F.No.1- 101/PGRC/AICTE/ Regulation/2019 dated 07.11.2019 for establishment of grievance redressal mechanism for all AICTE approved Technical Institutions. Non-compliance of the above Regulations shall call for punitive action.

Guidelines for Establishment of Grievance Redressal Mechanism for students and faculty.

Refer: Redressal of Grievance of Students Regulation, 2019 vide F.No.1-101/PGRC/AICTE / Regulation / 2019 dated 07.11.2019 and **Appendix 6.3.2**.

### 2) Grievance Redressal Mechanism for Faculty / Staff

It is mandatory for all Technical Institutions to address the grievances of faculty/staff members including service matters at the Institution level itself. A Grievance Redressal Committee (GRC) for faculty/staff members shall be constituted by each Institution to look into the grievances of the faculty/staff members. The composition of the GRC shall be as follows:

a) Principal of the Institution as Chairperson

b) One Senior Professor of the affiliating University as a Member

c) One official from University or State DTE (Directorate of Technical Education) (to be nominated by DTE/University Vice Chancellor) as a Member

d) One Senior Faculty (not below Associate Professor) as Member.

i. A complaint from an aggrieved faculty/staff member relating to the institution shall be addressed to the Chairperson, Grievance Redressal Committee (GRC).

ii. The GRC shall send its report with recommendations, if any, to the concerned DTE or University and a copy thereof to the aggrieved faculty/staff member, within a period of 15 days from the date of receipt of the complaint.

iii. In case faculty/staff is not satisfied with the decision of Grievance Redressal Committee, they may appeal to the concerned affiliating University/State DTE (in case of diploma institute) for redressal of their grievance.

The University level or DTE level Grievance Redressal Cell established by the University or DTE shall address such grievances and settle the matter at State/University level.

An Institution shall furnish, prominently, on its website, all relevant information in respect of the Grievance Redressal Committee(s) coming under its purview.

Refer: All India Council for Technical Education (Redressal of Grievance of Faculty/Staff Member) regulations, 2021 vide F.no. 1-103/AICTE/PGRC/Regulation/2021 dated 25.03.2021